प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**"चेंजिंग माईंडस": विचार परिवर्तनातून सेवापरिवर्तनाकडे - सिडकोचा उपक्रम**

कर्मचारी कार्यक्षमता, नैतिकता, उत्तरदायित्व आणि लोकाभिमुख सेवा यांना नवी दिशा देण्यासाठी सिडकोमध्ये "चेंजिंग माईंडस" या महत्त्वपूर्ण उपक्रमाची नव्या संकल्पना आणि तत्त्वज्ञानासह पुनश्च सुरुवात करण्यात आली. सिडको भवन येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या प्रेरणादायी कार्यशाळेत महामंडळातील विभागप्रमुख आणि विभागीय अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

पूर्वी या उपक्रमांतर्गत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात येत होते. मात्र, यावेळी प्रथमच संस्थेतील अनुभवी वरिष्ठ अधिकारी, त्यांचे ज्ञान, अनुभव आणि नेतृत्वगुण यांचा प्रभावीपणे उपयोग करून कर्मचाऱ्यांशी अधिक परिणामकारक संवाद साधण्याची अभिनव संकल्पना राबविण्यात आली. या माध्यमातून संस्थेच्या अंतर्गत बौद्धिक संपदेचा उपयोग करत सकारात्मक आणि परिणामकारक कार्यसंस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**"प्रत्येक परिवर्तनाची सुरुवात मनापासून होत असते. कोणतीही व्यवस्था बदलण्यापूर्वी आपल्या विचारसरणीत सकारात्मक बदल घडवून आणणे आवश्यक आहे. 'चेंजिंग माईंडस' हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम नसून स्वतःला अधिक सक्षम, संवेदनशील आणि उत्तरदायी बनविण्याचा प्रवास आहे. नागरिकांना वेळेत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सेवाभाव आणि नैतिकता यांची सांगड घातल्यास कोणतीही संस्था उत्कृष्टतेच्या शिखरावर पोहोचू शकते."**

**श्री. शान्तनु गोयल**
**सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको**

**"महाराष्ट्र शासनाच्या 'सेवा हक्क' आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या संकल्पनांना अधिक बळकटी देण्यासाठी प्रत्येक विभागाने कार्यक्षमतेची नवी मानके निर्माण करणे आवश्यक आहे. शासनाकडून**

**विविध विभागांच्या कामकाजाचे सातत्याने मूल्यमापन केले जात आहे. अशा परिस्थितीत नागरिकांच्या अपेक्षांनुसार जलद, पारदर्शक आणि परिणामकारक सेवा देण्यासाठी प्रत्येकाने स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे."**

**श्री. गणेश देशमुख**
**सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको**

**"प्रशासकीय यंत्रणेत काम करताना नियमांइतकीच संवेदनशीलताही महत्त्वाची असते. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या भूमिकेकडे केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर सार्वजनिक उत्तरदायित्व म्हणून पाहिले पाहिजे. संस्थेची प्रतिमा ही कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणा, कार्यक्षमता आणि कार्यसंस्कृतीवर उभी असते. 'चेंजिंग माईंडस' हा उपक्रम त्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे."**

**श्री. सुरेश मेंगडे**
**मुख्य दक्षता अधिकारी, सिडको**

वक्त्यांनी यावेळी स्पष्ट केले की, या उपक्रमाचा उद्देश केवळ भ्रष्टाचाराला आळा घालणे एवढाच मर्यादित नसून, सेवाभिमुख प्रशासन, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि परिणामकारक सेवा वितरण यांना संस्थात्मक संस्कृतीचा अविभाज्य भाग बनविणे हा आहे. महाराष्ट्र शासनाच्या "सेवा हक्क" 'राईट टू सर्विसेस' उपक्रमामुळे शासकीय विभागांच्या कामगिरीचे सातत्याने मूल्यमापन होत असून, नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे.

कार्यशाळेदरम्यान कार्यप्रणालीतील अडथळे दूर करणे, कामकाज अधिक सुसूत्र आणि कार्यक्षम बनविणे, प्रलंबित प्रकरणांचे वेळेत निवारण करणे तसेच नागरिकांच्या अपेक्षांशी सुसंगत कार्यसंस्कृती विकसित करणे या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. उपस्थित अधिकाऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत, संस्थेमध्ये सकारात्मक परिवर्तनाची नवी ऊर्जा निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली.

'चेंजिंग माईंडस' ही केवळ एक संकल्पना नसून विचार, वृत्ती आणि कार्यपद्धतीत सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारी प्रभावी चळवळ ठरणार असून, सिडकोच्या लोकाभिमुख, पारदर्शक आणि परिणामकारक प्रशासनाच्या वाटचालीला नवी गती देईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन सिडकोच्या दक्षता विभागातर्फे मुख्य दक्षता अधिकारी श्री. सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, उत्तरदायित्वाची जाणीव आणि सेवाभिमुख कार्यसंस्कृती विकसित करण्याचा संदेश देण्यात आला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -